GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

# नांदेड जिल्ह्यातील उमरी तालुक्यातील तळेगाव गावातील कुटुंबांच्या उत्पन्न व उपभोगातील आर्थिक विषमता

**दत्ता लक्ष्मण तर्पेवाड**
**डॉ. मानसी विलास गोरे**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
अर्थशास्त्र विभाग, आंबेडकर भवन, पुणे – ४११००७

## सारांश

तळेगाव गावातील कुटुंबांच्या उत्पन्न आणि उपभोग गटानुसार लक्षणीय फरक असून, आर्थिक विषमता ही स्थानिक पातळीवरील महत्त्वाची सामाजिक-आर्थिक समस्या बनली आहे. रोजगाराच्या संधी, शेतीवरील अवलंबित्व, उत्पन्नाचे विविध स्रोत, शैक्षणिक स्थिती, सामाजिक घटक आणि कुटुंबांची आर्थिक साधनसंपत्ती यांचा उत्पन्न आणि उपभोग वितरणावर थेट परिणाम होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या नवीन संधी, कौशल्यविकास, दर्जेदार शिक्षण, कृषीपूरक व्यवसाय आणि उत्पन्नवाढीचे मार्ग उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने समावेशक विकास धोरणांची तातडीने आवश्यकता आहे.

गावातील एकूण उत्पन्नाचा मोठा हिस्सा श्रीमंत कुटुंबांकडे केंद्रित झालेला असून, सर्वात गरीब कुटुंबांच्या हाती अतिशय अल्प उत्पन्न येते. श्रीमंत आणि गरीब गटांमधील उत्पन्नाची ही तफावत जास्त आहे. गावातील सर्व कुटुंबांची आर्थिक स्थिती समान नसून, त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात मोठी विविधता व विषमता दिसून येते. गिनी गुणांक आणि विचलन गुणांकाचे मोजमाप गावात मध्यम ते उच्च स्वरूपाची उत्पन्न विषमता सिद्ध करते. गरीब कुटुंबांचे उत्पन्न अत्यंत कमी असले, तरी त्यांना मूलभूत जीवनावश्यक गरजा भागवण्यासाठी उत्पन्नाच्या तुलनेत अधिक उपभोग खर्च करावा लागत आहे. यामुळे त्यांच्यावर आर्थिक ताण पडत असल्याचे स्पष्ट होते. उत्पन्नाच्या तुलनेत उपभोग खर्चातील विषमता अधिक तीव्र आहे. गावातील उच्च उत्पन्न गट आणि अति-निम्न गट यांच्या राहणीमानात व उपभोग क्षमतेत प्रचंड दरी

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

असल्याचे दिसून येते. गावातील मध्यम-उच्च उत्पन्न गटाचा उपभोग खर्च अनपेक्षितपणे कमी असून, त्यांची खरेदी क्षमता अत्यंत मर्यादित असल्याचे स्पष्ट होते.

उपभोग खर्चाचे असमान वितरण: गावातील श्रीमंत २०% कुटुंबे एकूण उपभोग खर्चाचा सर्वाधिक (३३.४०%) भाग नियंत्रित करतात, तर सर्वात गरीब २०% कुटुंबे २३.६७% उपभोग घेतात. उत्पन्नातील तीव्र विषमता: सर्वात गरीब २०% कुटुंबांचा एकूण उत्पन्नातील वाटा अतिशय अल्प (केवळ ८.७३%) आहे, तर श्रीमंत २०% गटाचा उत्पन्नातील वाटा ३६.९६% आहे (दोन्हींमध्ये तब्बल २८.२३% ची तफावत आहे).

**की:वर्ड्स-** आर्थिक विषमता, उत्पन्न वितरण, उपभोग वितरण, गिनी गुणांक, प्रमाणित विचलन, विचलन गुणांक.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेसाठी राज्याची सहा प्रशासकीय विभागांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. हे विभाग कोकण, औरंगाबाद, पुणे, नाशिक, नागपूर आणि अमरावती असे आहेत. यापैकी औरंगाबाद विभागाचा समावेश मराठवाडा प्रदेशात होतो. मराठवाडा हा तुलनेने मागासलेला प्रदेश म्हणून ओळखला जातो (यशदा, २०१४). महाराष्ट्र शासनाच्या २०११–१२ च्या आर्थिक पाहणी अहवालानुसार, चालू किमतीनुसार महाराष्ट्राचे दरडोई निव्वळ जिल्हा देशांतर्गत उत्पादन ₹६०,०१३ इतके होते. त्यापैकी औरंगाबाद ₹८४,२९५, जालना ₹५०,२६२, परभणी ₹५०,७१६, हिंगोली ₹४९,४७०, बीड ₹५२,१७७, लातूर ₹८१,५५७, उस्मानाबाद ₹४८,८८७ आणि नांदेड ₹४४,९७८ इतके होते. या आकडेवारीवरून मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याचे दरडोई निव्वळ जिल्हा उत्पादन तुलनेने कमी असल्याचे दिसून येते. मराठवाड्यात एकूण आठ जिल्हे आहेत. त्यापैकी नांदेड, हिंगोली आणि औरंगाबाद हे तुलनेने मागास जिल्हे म्हणून ओळखले जातात (बनसोडे, २०२१). नांदेड जिल्ह्याचा मराठवाड्यातील मागास जिल्हा म्हणून उल्लेख आढळतो. त्यामुळे प्रस्तुत अभ्यासासाठी नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यात एकूण १६ तालुके आहेत. त्यापैकी दारिद्र्यरेषेखालील (BPL) लोकसंख्येचे प्रमाण उमरी तालुक्यात सर्वाधिक ३७.८ टक्के असल्याचे नमूद केले आहे, तर किनवट तालुक्यात हे प्रमाण २५ टक्के आहे. उमरी तालुक्यात

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

दारिद्र्याचे प्रमाण तुलनेने अधिक असल्याने या तालुक्याची निवड करण्यात आली आहे. उमरी तालुक्यात एकूण ६६ गावे आहेत. या गावांपैकी तळेगाव येथे दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण २३ टक्के असल्याचे नमूद केले आहे, तर गनिपूर येथे हे प्रमाण १३ टक्के आहे. तळेगावमध्ये आदिवासी आणि गैर-आदिवासी लोकसंख्या लक्षणीय प्रमाणात असल्यामुळे प्रस्तुत अभ्यासासाठी तळेगाव गावाची निवड करण्यात आली आहे.

मनरेगा (MGNREGA) २०११–१२ च्या अहवालानुसार तळेगावातील एकूण लोकसंख्येपैकी १,०४५ लोक दारिद्र्यरेषेखालील (BPL) असल्याचे नमूद आहे, जे सुमारे २३ टक्के आहे. गावाची एकूण लोकसंख्या ४,५३४ असून त्यापैकी २,३२३ पुरुष आणि २,२११ स्त्रिया आहेत. गावात ८२१ कुटुंबे असून साक्षर लोकसंख्या २,७८२ आहे. त्यापैकी १,६०२ पुरुष आणि १,१८० स्त्रिया आहेत. गावातील एकूण कामगार संख्या २,२८४ आहे. त्यापैकी ५११ शेतकरी आणि ९४८ कृषी कामगार आहेत. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे प्रमाण अनुक्रमे १५.६६ टक्के आणि १७.६२ टक्के आहे.

**संदर्भसाहित्याचा आढावा:-**

१) अटकिन्सन (२०१५), “The Idiots” in “The Savoy”: Decadence and the Celtic Fringe” :- विकसित व विकसनशील देशांमध्ये विकासाच्या योजना आणि धोरणांमध्ये वेळोवेळी बदल होत असतात. या बदलांचा गरीब कुटुंबांवर परिणाम होऊन आर्थिक विषमता निर्माण होण्याची शक्यता असते.

२) श्रीवास्तव आणि मोहंती (२०१०), “Poverty Among Elderly in India”:- विकसनशील देशांमध्ये कुटुंबांना उत्पन्न मिळविण्यासाठी विविध स्रोत उपलब्ध असतात. हंगामी तसेच बिगर-हंगामी उत्पन्नाच्या स्रोतांचा वापर कुटुंबांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करतो.

३) सेन आणि हिमांशू (२००४), “Poverty and Inequality in India-I”; बॅनर्जी आणि पिकेटी (२००५), “Top Indian Incomes, 1922–2000” :- उपलब्ध साहित्यावरून असे दिसून येते की LPG धोरणांपूर्वी भारतातील आर्थिक विषमता तुलनेने कमी होती. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणानंतर भारतीय अर्थव्यवस्था

अधिक खुली आणि बाजाराभिमुख झाली. त्यानंतर उत्पन्न, संपत्ती आणि उपभोगाच्या वितरणामध्ये लक्षणीय फरक निर्माण झाल्याचे अभ्यासातून दिसून येते.

४) सुब्रमणियन आणि जयराज (२०१३), "Economic Inequality in India: Value-Free Measurement":- कृषी क्षेत्रातील समस्या आणि नैसर्गिक आव्हाने यांमुळे आर्थिक विषमता वाढण्यास हातभार लागू शकतो, असे या अभ्यासात स्पष्ट करण्यात आले आहे.

५) बसोले आणि बसू (२०१५), "Non-Food Expenditures and Consumption Inequality in India":- टिकाऊ वस्तू, शिक्षण, आरोग्य आणि ग्राहक सेवांवरील खर्चातील फरकांमुळे उपभोगाच्या विषमतेमध्ये वाढ होऊ शकते.

६) भल्ला (२०११), "Inclusive Growth? Focus on Employment"; भगवती आणि पनगडिया (२०१३), "Economic Development, Technological Change and Growth":- आर्थिक वृद्धी, रोजगार आणि आर्थिक विषमता यांचा परस्पर संबंध आहे. आर्थिक वृद्धीचे लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचावेत यासाठी समावेशक आर्थिक वृद्धीची संकल्पना महत्त्वाची ठरते.

७) सेन आणि हिमांशू (२००४), "Poverty and Inequality in India-II" :- ५५व्या NSS फेरीतील माहितीचा वापर करून दारिद्र्य आणि आर्थिक विषमतेच्या प्रवाहाचा अभ्यास करण्यात आला आहे. आर्थिक वृद्धीबरोबर दारिद्र्यात घट झाल्याचे आढळते. या निष्कर्षांचा धोरणनिर्मिती आणि सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने उपयोग होतो.

८) रावल आणि स्वामीनाथन (२०११), "Income Inequality and Caste in Village India":- चार राज्यांतील आठ गावांमध्ये उत्पन्न विषमतेचा अभ्यास करण्यात आला. उत्पन्न विषमता मोजण्यासाठी गिनी गुणांकाचा वापर करण्यात आला असून विविध सामाजिक गटांमधील आर्थिक विषमतेचा विचार करण्यात आला आहे.

९) बनसोडे आणि स्वामीनाथन (२०२१), "Caste Discrimination in the Provision of Basic Amenities: A Note Based on Census Data for a Backward Region of Maharashtra":- २०११ च्या जिल्हा

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

जनगणना हँडबुकच्या आधारे मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांचा अभ्यास करण्यात आला. नांदेडसारख्या मागास भागांमध्ये पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, बँकिंग, दळणवळण आणि वाहतूक सुविधांची कमतरता असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

१०) हबानाबाकिझे (२०२१), "Determining the Household Consumption Expenditure's Resilience towards Petrol Price, Disposable Income and Exchange Rate Volatilities" :- कुटुंबाचा उपभोग खर्च हा उपलब्ध उत्पन्न, आर्थिक परिस्थिती आणि किमतीतील बदल यांच्याशी संबंधित असतो. कुटुंबाचे उत्पन्न आणि उपभोग खर्च हे सामाजिक-आर्थिक स्थितीच्या अभ्यासासाठी महत्त्वाचे निर्देशक आहेत.

११) फ्रिडमन (१९५७), "A Theory of the Consumption Function: The Permanent Income Hypothesis" :- फ्रिडमन यांच्या मते उपभोगाचे वर्तन हे कायमस्वरूपी उत्पन्नाशी संबंधित असते. व्यक्ती आपल्या दीर्घकालीन उत्पन्नाच्या अपेक्षांचा विचार करून उपभोगविषयक निर्णय घेतात.

१२) रटस्टीन (२००८), "Socio-economic Differentials in Health, Nutrition and Population" :- दीर्घकालीन सामाजिक-आर्थिक विषमतेचा आरोग्य, पोषण आणि लोकसंख्याविषयक परिणामांशी संबंध असतो. ग्रामीण व शहरी कुटुंबांच्या संपत्तीतील फरकामुळे सामाजिक-आर्थिक विषमता कायम राहू शकते.

१३) डॉ. सुखदेव थोरात आणि डॉ. नितीन तागडे, 'महाराष्ट्रातील विषमता आणि गरिबी, संपत्तीतील असमानता व जातीय भेदभावाचा प्रभाव' :- या पुस्तकात विषमता, दारिद्र्य, कुपोषण आणि जातीय भेदभाव यांचा परस्परसंबंध स्पष्ट करण्यात आला आहे. एका सामाजिक-आर्थिक समस्येमुळे दुसरी समस्या कशी निर्माण होऊ शकते, याचे विवेचन करण्यात आले आहे.

१४) सायमन कझनेट्स (१९५५), कझनेट्स वक्र :- कझनेट्स यांच्या मते आर्थिक विकासाच्या प्रारंभिक टप्प्यात आर्थिक विषमता वाढू शकते; परंतु विकासाची प्रक्रिया पुढे गेल्यानंतर विषमता कमी होण्याची शक्यता असते. या संबंधाचे स्पष्टीकरण उलट्या U-आकाराच्या वक्राद्वारे केले जाते.

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

१५) महालनोबीस समिती (१९६०):- भारत सरकारने राष्ट्रीय उत्पन्नाच्या वितरणाचा अभ्यास करण्यासाठी प्रा. पी. सी. महालनोबीस यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. प्रस्तुत संदर्भसाहित्यानुसार पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांच्या काळात (१९५१–१९६१) भारतातील आर्थिक विषमता वाढली. राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न वाढले असले तरी त्याचे वितरण समान प्रमाणात झाले नाही आणि श्रीमंत व गरीब वर्गांमधील अंतर वाढले.

**संशोधनातील उणीव:-**

- राष्ट्रीय व राज्यस्तरीय आर्थिक विषमतेवर तुलनेने अधिक अभ्यास झाले आहेत; स्थानिक कुटुंब पातळीवरील अभ्यास मर्यादित आहेत.
- उत्पन्न आणि उपभोग विषमतेचा अभ्यास स्वतंत्रपणे झाला आहे; दोन्हींचा एकत्रित अभ्यास कमी आहे.
- आर्थिक विषमतेच्या अभ्यासात उत्पन्न, रोजगार, मालमत्ता, शिक्षण, आरोग्य, जात आणि मूलभूत सुविधा या सर्व घटकांचा एकत्रित विचार मर्यादित आहे.
- मराठवाड्यासारख्या मागास प्रदेशातील कुटुंबांच्या आर्थिक विषमतेचे सूक्ष्म पातळीवरील विश्लेषण अधिक आवश्यक आहे.
- आर्थिक वृद्धीचे लाभ विविध उत्पन्न गटांतील कुटुंबांपर्यंत कितपत आणि कोणत्या स्वरूपात पोहोचले आहेत, याबाबत स्थानिक पातळीवरील पुरावे मर्यादित आहेत.

राष्ट्रीय व राज्य पातळीवरील व्यापक सिद्धांतांची तळेगावसारख्या विशिष्ट सामाजिकआर्थिक पार्श्वभूमी असलेल्या - ग्रामीण व मागास भागात प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि पडताळणी करणारा अभ्यास उपलब्ध साहित्यात दिसून येत .नाही त्यामुळे प्रस्तुत संशोधन आर्थिक विषमतेचे स्वरूप, निर्धारक आणि परिणाम यांचा कुटुंब पातळीवर एकात्मिक अभ्यास करण्याची उणीव भरून काढण्याचा प्रयत्न सुरु आहे.

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

१) उमरी तालुक्यातील तळेगाव गावातील उत्पन्न आणि उपभोगातील कल, स्वरूप, रचना आणि आर्थिक विषमतेचा अभ्यास करणे.

२) तळेगाव गावातील उत्पन्न आणि उपभोगातील स्वरूप आणि त्यातील आर्थिक विषमतेचा अभ्यास करणे.

संशोधन परिकल्पना:-

१) उमरी तालुक्यातील तळेगाव गावातील कुटुंबांच्या उत्पन्न आणि उपभोगातील आर्थिक विषमता आढळते.

संशोधन पद्धती:-

अ) प्राथमिक माहितीचे स्रोत तळेगाव गावातील कुटुंबांकडून संरचित प्रश्नावली, प्रत्यक्ष भेटी आणि मुलाखती यांच्या माध्यमातून प्राथमिक माहिती संकलित करण्यात आलेले आहे, प्राथमिक माहिती संकलनाची साधने :

१)प्रश्नावली

२) प्रत्यक्ष भेटी व क्षेत्रीय मुलाखती / अहवाल

आ) दुय्यम माहितीचे स्रोत भारताची २०११ ची जनगणना, महाराष्ट्राचे आर्थिक व सांख्यिकी अहवाल, सामाजिक-आर्थिक अहवाल, जिल्हा सांख्यिकी अहवाल, जिल्हा नियोजन अहवाल, जिल्हा परिषद कार्यालयातील नोंदी, जिल्हा राजपत्र आणि इतर संबंधित शासकीय प्रकाशने यांचा वापर करण्यात आला आहे. संबंधित २०२१ जनगणनेची माहिती उपलब्ध झाल्यास तिचाही आवश्यकतेनुसार वापर करण्यात आला आहे.

**माहितीचे विश्लेषण:-**

गावाची एकूण लोकसंख्या ४,५३४ असून त्यापैकी २,३२३ पुरुष आणि २,२११ स्त्रिया आहेत. गावात ८२१ कुटुंबे असून साक्षर लोकसंख्या २,७८२ आहे. त्यापैकी १,६०२ पुरुष आणि १,१८० स्त्रिया आहेत. गावातील एकूण कामगार संख्या २,२८४ आहे. त्यापैकी ५११ शेतकरी आणि ९४८ कृषी कामगार आहेत. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे प्रमाण अनुक्रमे १५.६६ टक्के आणि १७.६२ टक्के आहे. गावातील एकुण ८२१ कुटुंब आहेत त्यापैकी २६५

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

कुटुंब यांचा सर्वेक्षण केले आहे. त्यामध्ये खुला प्रवर्ग ८२ कुटुंब, इतर मागासप्रवर्ग यांचे कुटुंब हे ८६ आहेत, तसेच अनुसूची जमाती ४७ कुटुंब आहेत, अनुसूची जाती ५० कुटुंब आहेत.

**"तळेगाव गावातील कुटुंबांच्या उत्पन्नाचे गटानुसार वितरण व संचयी उत्पन्न"**

| उत्पन्न गट | प्रती कुटूंब उत्पन्न | संचयी कुटूंब | उत्पन्नातील टक्केवारी | संचयी उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| सर्वात कमी २०% | ४३,२०७ | २०% | ८.७३ | ८.७३ |
| २०% ते ४०% | ६८,८६७.९२ | ४०% | १३.९१ | २२.६४ |
| ४०% ते ६०% | १,००,००० | ६०% | २०.२० | ४२.८४ |
| ६०% ते ८०% | १,००,००० | ८०% | २०.२० | ६३.०४ |
| सर्वाधिक ८०% | १,८३,०१८ | १००% | ३६.९६ | १०० |

स्रोत:- Internat J.Com & Bus. Manage, 7(2) Oct. 2014:269-276

| सांख्यिकीय मापन | मूल्य (रुपये) |
|---|---|
| सरासरी उत्पन्न | ९९,०१८.५८ |
| प्रमाणित विचलन (SD) | ४७,०७९.९८ |
| विचलन गुणांक (CV) | ४७.५५% |
| गिनी गुणांक | ०.२५११ |

- उत्पन्नातील गटवार फरक स्पष्ट दिसून येतो : तळेगाव गावातील कुटुंबांचे उत्पन्न पाच समान गटांमध्ये विभागले असता सर्वात कमी 20% कुटुंबांचे प्रती-कुटुंब उत्पन्न ₹43,207 आहे, तर सर्वाधिक 20% कुटुंबांचे प्रती-कुटुंब उत्पन्न ₹1,83,018 आहे. त्यामुळे उत्पन्नाच्या वितरणामध्ये स्पष्ट तफावत आढळून येते.

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

- सर्वात कमी उत्पन्न गटाचा वाटा कमी आहे : सर्वात कमी 20% कुटुंबांकडे एकूण उत्पन्नापैकी केवळ 8.73% उत्पन्न आहे. म्हणजेच लोकसंख्येच्या पाचव्या भागाकडे एकूण उत्पन्नाच्या दहाव्या भागापेक्षाही कमी उत्पन्न आहे. यावरून या गटाची आर्थिक स्थिती तुलनेने कमकुवत असल्याचे दिसते.
- 20% ते 40% गटाची स्थिती : दुसऱ्या 20% कुटुंबांकडे एकूण उत्पन्नापैकी 13.91% उत्पन्न आहे. पहिल्या दोन गटांचा एकत्रित वाटा 22.64% होतो. म्हणजेच एकूण 40% कुटुंबांकडे केवळ 22.64% उत्पन्न केंद्रित आहे.
- मध्यम उत्पन्न गटाचा उत्पन्नातील वाटा वाढतो : 40% ते 60% या गटाचा उत्पन्नातील वाटा 20.20% आहे. पहिल्या 60% कुटुंबांचा एकत्रित उत्पन्नातील वाटा 42.84% आहे. त्यामुळे मध्यम उत्पन्न गटाची आर्थिक स्थिती खालच्या दोन गटांपेक्षा तुलनेने चांगली असल्याचे दिसून येते.
- 60% ते 80% गटाचे उत्पन्न मध्यम पातळीवर आहे : 60% ते 80% या गटाचाही उत्पन्नातील वाटा 20.20% आहे. या गटासह एकूण 80% कुटुंबांकडे 63.04% उत्पन्न आहे. यावरून उर्वरित 20% कुटुंबांकडे 36.96% उत्पन्न असल्याचे स्पष्ट होते.
- सर्वाधिक 20% कुटुंबांकडे उत्पन्नाचे मोठे केंद्रीकरण आहे : सर्वाधिक 20% कुटुंबांकडे एकूण उत्पन्नापैकी तब्बल 36.96% उत्पन्न आहे. त्या तुलनेत सर्वात कमी 20% कुटुंबांकडे केवळ 8.73% उत्पन्न आहे. म्हणजेच सर्वाधिक उत्पन्न गटाचा वाटा सर्वात कमी उत्पन्न गटाच्या सुमारे 4.2 पट आहे.
- उत्पन्नातील सापेक्ष विविधता जास्त आहे : दिलेल्या आकडेवारीनुसार SD सुमारे ₹47,079.98 आणि CV सुमारे 47.55% आहे. CV चे मूल्य तुलनेने मोठे असल्यामुळे कुटुंबांच्या उत्पन्नामध्ये लक्षणीय विविधता असल्याचे दिसून येते. म्हणजेच सर्व कुटुंबांचे उत्पन्न सरासरी उत्पन्नाच्या जवळपास समान नसून त्यामध्ये मोठे फरक आहेत.

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

- गिनी गुणांक आर्थिक विषमतेचे निदर्शक आहे : दिलेल्या संचयी उत्पन्नाच्या आकडेवारीवरून गिनी गुणांक सुमारे 0.251 प्राप्त होतो. गिनी गुणांक शून्याच्या जवळ असेल तर उत्पन्नाचे वितरण तुलनेने समान असते, तर मूल्य वाढल्यास विषमता वाढते. त्यामुळे 0.251 हे मूल्य तळेगावमध्ये लक्षणीय परंतु अत्यंत तीव्र नसलेली उत्पन्न विषमता दर्शवते.
- लॉरेन्झ वक्राच्या आधारे विषमता दिसून येते : जर संचयी कुटुंबांची टक्केवारी आणि संचयी उत्पन्नाची टक्केवारी यांची तुलना केली, तर 40% कुटुंबांकडे केवळ 22.64% उत्पन्न, तर 80% कुटुंबांकडे 63.04% उत्पन्न आहे. समान उत्पन्न वितरणाच्या स्थितीत या दोन्ही टक्केवारी समान असल्या असत्या. त्यामुळे या फरकावरून उत्पन्न वितरणामध्ये विषमता असल्याचे स्पष्ट होते.
- एकूण आर्थिक स्थितीचा निष्कर्ष : तळेगाव गावातील उत्पन्न वितरणाचा विचार करता, सर्वाधिक 20% कुटुंबांकडे उत्पन्नाचा मोठा हिस्सा केंद्रित असून सर्वात कमी 20% कुटुंबांचा उत्पन्नातील वाटा कमी आहे. SD, CV आणि Gini गुणांक या तिन्ही निदर्शकांवरून कुटुंबांच्या उत्पन्नामध्ये लक्षणीय फरक व आर्थिक विषमता आढळते. त्यामुळे गावातील आर्थिक विषमता समजून घेण्यासाठी रोजगाराचे स्वरूप, शेतीचे क्षेत्र, व्यवसाय, शिक्षण, कुटुंबाचा आकार आणि उत्पन्नाचे विविध स्रोत या घटकांचाही विचार करणे आवश्यक आहे.

**“तळेगाव गावातील कुटुंबांच्या उपभोगाचे गटानुसार वितरण व संचयी”**

| उपभो गट | सरासरी कुटूंब उपभोग | संचयी कुटूंब | उपभोगातील टक्केवारी | संचयी उपभोग |
|---|---|---|---|---|
| सर्वात कमी २०% | २,७६,८३५ | २०% | २३.६७ | २३.६७ |
| २०% ते ४०% | १,७७,२७० | ४०% | १५.१६ | ३८.८३ |
| ४०% ते ६०% | २,२०,३५१ | ६०% | १८.९४ | ५७.७७ |
| ६०% ते ८०% | १,०४,६२० | ८०% | ८.९४ | ६६.७१ |
| सर्वाधिक ८०% | ३,९०,६६६ | १००% | 33.४० | १०० |

स्रोत:- Internat J.Com & Bus. Manage, 7(2) Oct. 2014:269-276

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

| विषमता निर्देशांक | उत्पन्न | उपभोग |
|---|---|---|
| गिनी गुणाक | २५.११% | २५.९४% |
| सर्वाधिक २० टक्केवारी | ३६.९६% | 33.४०% |
| सर्वात कमी २० टक्केवारी | ८.७३% | २३.६७% |
| ९०/१० प्रमाण | ४ | १४.९३ |
| ८०/२० प्रमाण | २ | ३ |

- एकूण उपभोग खर्चाचे प्रमाण: गावातील विविध उत्पन्न गटांचा विचार करता, सर्वाधिक ८०% (श्रीमंत) गटाचा सरासरी कौटुंबिक उपभोग खर्च हा ३,९०,६६६ रुपयांसह सर्वात जास्त आहे.
- निम्न गटाचा उपभोग खर्च: सर्वात कमी २०% (गरीब) गटातील कुटुंबांचा सरासरी उपभोग खर्च २,७६,८३५ रुपये असून, एकूण उपभोग खर्चात या गटाचा वाटा २३.६७% आहे.
- मध्यम-निम्न गटाची स्थिती (२०% ते ४०%): या गटातील कुटुंबांचा सरासरी उपभोग खर्च १,७७,२७० रुपये आहे, जो एकूण उपभोगाच्या केवळ १५.१६% हिस्सा व्यापतो.
- मध्यम गटाचा उपभोग (४०% ते ६०%): मध्यक गटातील कुटुंबांचा सरासरी उपभोग खर्च २,२०,३५१ रुपये असून, एकूण उपभोग खर्चात या गटाचा वाटा १८.९४% इतका आहे.
- मध्यम-उच्च गटातील तफावत (६०% ते ८०%): या गटाचा सरासरी उपभोग खर्च सर्वात कमी म्हणजे १,०४,६२० रुपये नोंदवला गेला आहे, जो एकूण उपभोग खर्चाच्या अवघा ८.९४% आहे.
- उच्च गटाचे वर्चस्व: सर्वाधिक ८०% (श्रीमंत) गटाचा एकूण उपभोगातील वाटा ३३.४०% असून, गावात सर्वाधिक उपभोग खर्च याच वर्गाकडून केला जातो.
- संचयी उपभोग (Cumulative Consumption) ५७.७७%: गावातील तळातील ६०% कुटुंबे मिळून एकूण उपभोग खर्चाचा ५७.७७% हिस्सा व्यापतात, म्हणजेच उर्वरित ४०% लोकसंख्या उर्वरित उपभोग खर्च करते.

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

- संचयी उपभोग ६६.७१%: तळातील ८०% कुटुंबांपर्यंत पोहोचताना संचयी उपभोग ६६.७१% होतो, तर सर्वात वरील २०% श्रीमंत गट एकटा ३३.२९% उपभोग नियंत्रित करतो.
- गिनी गुणांक (Gini Coefficient) तुलना: उत्पन्नाचा गिनी गुणांक २५.११% आहे, तर उपभोगाचा गिनी गुणांक २५.९४% आहे. उत्पन्नापेक्षा उपभोगातील गिनी गुणांक जास्त असणे हे दर्शवते की उपभोग खर्चात विषमता किंचित जास्त आहे.
- सर्वाधिक २०% गटाची विषमता: उत्पन्नाच्या बाबतीत श्रीमंत २०% गटाचा वाटा ३६.९६% आहे, तर उपभोगाच्या बाबतीत या गटाचा वाटा ३३.४०% आहे.
- सर्वात कमी २०% गटाची विषमता: गरीब २०% गटाचा उत्पन्नातील वाटा अतिशय कमी (केवळ ८.७३%) आहे, परंतु त्यांच्या उपभोग खर्चाचा वाटा २३.६७% आहे. यावरून स्पष्ट होते की, कमी उत्पन्न असूनही मूलभूत गरजा भागवण्यासाठी या गटाला आपल्या उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करावा लागतो.
- उत्पन्नातील विषमता तफावत: सर्वात कमी २०% गटाचा उत्पन्नातील वाटा (८.७३%) आणि सर्वाधिक २०% गटाचा उत्पन्नातील वाटा (३६.९६%) यामध्ये तब्बल २८.२३% ची मोठी तफावत दिसून येते.
- ९०/१० प्रमाणातील विषमता: ९०/१० चे प्रमाण उत्पन्नासाठी ४ आहे, तर उपभोगासाठी ते १४.९३ इतके प्रचंड आहे. यावरून उच्च उत्पन्न गट आणि अति-निम्न गट यांच्यातील उपभोग खर्चात खूप मोठी दरी असल्याचे स्पष्ट होते.
- ८०/२० प्रमाणातील विषमता: ८०/२० चे प्रमाण उत्पन्नासाठी २ आहे, तर उपभोगासाठी ते ३ आहे. हे प्रमाण दाखवते की श्रीमंत २०% गट हा गरीब २०% गटाच्या तुलनेत ३ पट जास्त उपभोग खर्च करतो. आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की तळेगाव गावात उत्पन्नाची विषमता ही थेट उपभोगाच्या विषमतेवर प्रभाव पाडत आहे. गरीब

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

कुटुंबांना उत्पन्नाच्या तुलनेत उपभोग खर्चावर अधिक ताण सहन करावा लागत आहे, तर उच्च गट अधिक संपत्ती व उपभोग केंद्रित करत आहे.

**संशोधनाच्या मुख्य निष्कर्ष:**

तळेगाव गावातील उत्पन्न वितरणामध्ये सर्वाधिक 20% कुटुंबांकडे 36.96% उत्पन्न केंद्रित असून सर्वात कमी 20% कुटुंबांकडे केवळ 8.73% उत्पन्न आहे. तसेच CV 47.55% आणि Gini गुणांक 0.251 असल्याने गावातील कुटुंबांच्या उत्पन्नामध्ये लक्षणीय आर्थिक विषमता आढळून येते. सर्वात श्रीमंत २०% गट गावातील एकूण उपभोग खर्चाचा सर्वाधिक म्हणजे ३३.४०% भाग व्यापतो, तर सर्वात गरीब २०% गट २३.६७% भाग व्यापतो. गावातील ६०% ते ८०% या गटाचा सरासरी उपभोग खर्च सर्वात कमी (१,०४,६२० रुपये - केवळ ८.९४%) आहे, ज्यामुळे या गटाची खरेदी क्षमता अत्यंत सीमित असल्याचे दिसते. गिनी गुणांकानुसार उत्पन्नाची विषमता (२५.११%) आणि उपभोगाची विषमता (२५.९४%) या दोन्हीत तफावत असून, सर्वात कमी २०% गटाचा एकूण उत्पन्नातील वाटा अतिशय अल्प (केवळ ८.७३%) आहे. गरीब गटाचा उत्पन्नातील वाटा ८.७३% असला तरी मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना उपभोग खर्चात २३.६७% हिस्सा खर्च करावा लागतो, जे त्यांच्या उत्पन्नापेक्षा खर्चाचा ताण जास्त असल्याचे स्पष्ट करते. उत्पन्नासाठी ९०/१० चे प्रमाण ४ आहे, तर उपभोगासाठी ते १४.९३ इतके प्रचंड आहे. यावरून गावातील उच्च व अति-निम्न गटांच्या राहणीमानात व उपभोग क्षमतेत फार मोठी विषमता असल्याचे सिद्ध होते.

**संदर्भ:-**

१) Rawal, V., & Swaminathan, M. (2011). Income Inequality and Caste in Village India. The Journal of the Foundation for Agrarian Studies.

२) Atkinson, W. (2015). “The Idiots” in “The Savoy”: Decadence and the Celtic Fringe. Texas Tech University Press, 47(2), 113–131.

ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

३) Srivastava, A., & Mohanty, S. K. (2010). Poverty Among Elderly in India. Mumbai: Springer Science.

४) Sen, A., & Himanshu. (2004). Poverty and Inequality in India-I. Economic and Political Weekly, 39(38), 4247–4263.

५) Tulpule, B. (1968). Textile Wage Accord. Economic and Political Weekly.

६) Banerjee, A., & Piketty, T. (2005). Top Indian Incomes, 1922–2000. The World Bank Economic Review, 19(1), 1–20.

७) Subramanian, S., & Jayaraj, D. (2013). Economic Inequality in India: Value-Free Measurement. Challenge, 56(4), 26–37.

८) Basole, A., & Basu, D. (2015). Non-Food Expenditures and Consumption Inequality in India. Economic and Political Weekly, 50(36), 43–53.

९) Bhalla, S. H. (2007). Inclusive Growth? Focus on Employment. Social Scientist, 35(7/8), 24–43.

१०) Bhagwati, J., & Panagariya, A. (2013). Economic Development, Technological Change and Growth. Journal of Economic Literature.

११) Habanabakize, T. (2021). Determining the Household Consumption Expenditure’s Resilience towards Petrol Price, Disposable Income and Exchange Rate Volatilities. MDPI.

१२) Friedman, M. (1957). A Theory of the Consumption Function: The Permanent Income Hypothesis. Princeton University Press.

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

१३) Rutstein, S. (2008). Socio-economic Differentials in Health, Nutrition and Population. World Bank.

१४) Dreze, J., & Khera, R. (2013). Rural Poverty and the Public Distribution System. Economic and Political Weekly, 48(45/46), 55–60.

१५) Mazumdar, D., Sarkar, S., & Balwant, S. (2017). Inequality in India-II. Economic and Political Weekly.

१६) Jayaram, N. (2019). Protection of Workers’ Wages in India: An Analysis of the Labour Code on Wages, 2019. Economic and Political Weekly, 54(49).

१७) Sathe, D. (2002). Industrial Slowdown and Small Scale. Economic and Political Weekly.

१८) Ravindranath, D., & Siegel, S. (2015). Low Wages and Fast Food. Economic and Political Weekly.

१९) Aggarwal, A. (2017). Fairness of Minimum Wages of MGNREGA. Economic and Political Weekly.

२०) Mitra, A., & Singh, P. (2016). Why Wage Differences Exist Across Sectors? Explanations Based on India’s Industrial Sector. Economic and Political Weekly.

२१) Sen, A., & Himanshu. (2004). Poverty and Inequality in India-II. Economic and Political Weekly.

२२) MGNREGA अधिकृत माहिती संकेतस्थळ: https://mnregaweb2.nic.in/netnrega/dynamic_account_details_ippe.aspx

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 4
July - August: 2026

२३) Census 2011 गावविषयक माहिती: https://www.census2011.co.in/data/village/544907-talegaon-maharashtra.html

२४) Census of India 2011 – Maharashtra – Series 28 – Part XII B – District Census Handbook, Nanded.

२५) Maharashtra State Data Bank, Nanded District Statistical Abstract: https://mahasdb.maharashtra.gov.in/SDB_Reports/Nanded/PDF/2012-13_Nanded_DSA_8_28.pdf

२६) Friedman, M. (1957). Permanent Income Hypothesis. National Bureau of Economic Research: https://www.nber.org/books-and-chapters/theory-consumption-function/permanent-income-hypothesis